# सामाजिक चळवळींचे बदलते स्वरूप हे एक आव्हान

**श्री.अनिल पोपट लोखंडे,** सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग राजे रामराव महाविद्यालय, जत. जि सांगली. ई मेल lokhandeanil143@gmail.com

---

सामाजिक चळवळ म्हणजे मानवी समाजातील बदल, चलन आणि रूपांतराशी संबंधित एक व्यवस्थित, नियोजनबद्ध, स्वाभाविक प्रतिकाराची सामाजिक प्रतिक्रिया होय. सामाजिक चळवळ म्हणजे लोकांनी सामुहिकपणे केलली प्रतिक्रिया होय.

'सामाजिक चळवळ' ही संज्ञा सर्वप्रथम लॉरेन्झ वॉन स्टीन या जर्मन समाजशास्त्रज्ञाने वापरली. १८५० मध्ये त्यांच्या 'हिस्ट्री ऑफ दी फ्चरें सोशल मूव्हमेंट फ्रॉम १७८९ टू द प्रेझेंट' या पुस्तकात या संज्ञेचा संदर्भ मिळतो. ही संज्ञा एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात युरोपमध्ये लोकप्रिय झाली. सामाजिक चळवळीची विशिष्ट अशी एक व्याख्या करता येत नाही. विभिन्न समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक चळवळीतील वेगवेगळ्या घटकांना वेगवेगळ्या संदर्भाने अधोरेखित केले आहे. जगामध्ये सामाजिक क्षेत्रात जे बदल झालेले आपण आज पाहत आहे. ते सर्व बदल हे सामाजिक चळवळींचे फलित आहे. भारत या आपल्या मातृभूमीत देखील जे बदल दिसून येतात त्या मागील योगदान हे देखील सामाजिक चळवळींचे आहे हे आपण नाकारू शकत नाही.

भारतात सामाजिक चळवळींची वैचारिक बैठक ही भगवान गौतम बुद्ध, चार्वाक, संत तुकाराम महाराज, संत कबीर, छ.शिवाजी महाराज, क्रंतिगुरू लहुजी साळवे, म.जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी पेरियार, अण्णाभाऊ साठे यांच्यासह अनेक महापुरुषांनी मानवमुक्तीसाठी सामाजिक चळवळींची उभारणी करून केलेल्या कामातून, विचारातून, कृतीतून सामाजिक सुधारणा चळवळींनी अनिष्ट चालीरीतींना पायबंद घालून सामाजिक स्वास्थ्य व कल्याण यांसाठी केलेले उपाय व बदल होय. सामाजिक सुधारणा म्हणजे समाजात बुद्‌घिपुरस्सर समाज हितकारक केलेले बदल होत. सामाजिक सुधारणांचा मूळ हेतू लोकांचे प्राकृतिक, सामाजिक, मानसिक, बौद्‌घिक व भावनात्मक स्वास्थ्य अबाधित राखणे हा असतो.

सामाजिक चळवळींमुळे १९ व्या शतकाला भारताच्या इतिहासात नव्या युगाची नांदी म्हणतात. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर ९० च्या दशकापर्यंत धर्मनिरपेक्षतेचे काम करणाऱ्या धार्मिक चळवळी, स्त्री चळवळी, कामगार चळवळी, शेतकरी चळवळी, दलित चळवळी यासह इतर चळवळींनी सामाजिक क्षेत्रात केलेले कार्य उल्लेखनीय आहे. या कालखंडातील चळवळींचा हेतू सामाजिकदृष्ट्या वंचित, उपेक्षित, दुर्बल घटक, स्त्रिया, शेतकरी, कामगार, दलित यांचे होणारे शोषण कमी करण्यासाठी, माणूस म्हणून जगण्याची संधी निर्माण करून देण्यासाठी, हक्क आणि अधिकार याची जाणीव होऊन ते त्यांना मिळावेत. यासाठी जाणीव जागृती व प्रचार आणि प्रसार करण्यासाठी लोकांचा पाठिंबा व सहभाग वाढून न्यायाची लढाई उभारली जात होती. हे काम करणाऱ्या वेगवेगळ्या स्तरावर

सामाजिक सुधारणा चळवळींची निर्मिती झाली. या चळवळींचा हेतू हा नेहमी निःस्वार्थी होता.

मात्र १९९० च्या दशकानंतरच्या व अगोदरच्या चळवळींचे सध्य - स्थितीत स्वरूप मात्र आज आपणास दिवसेंदिवस बदललेले पाहायला मिळत आहे. पूर्वी नेते, कार्यकर्ते यांचा चळवळी मध्ये असणारा सहभाग, काम करण्याची पद्धत यापाठीमागे स्वार्थ नव्हता. सामाजिक परिवर्तन, न्यायाची चाड आणि अन्यायाची चीड, या तत्वाशी तडजोड न करता एकनिष्ठ आणि प्रामाणिकपणे आपली भूमिका बजावत असताना कोणताही बेगडी/ दिखाऊ पणा नव्हता. आता मात्र १९९० नंतरच्या सामाजिक चळवळी या आपला चेहरा किंवा रूप हे सामाजिक परिवर्तन/ सुधारणांचे लोकांना दाखवतात. वास्तविक पाहता कृतीत मात्र राजकीय स्वार्थ दिसून येत आहे. सामाजिक चळवळींनी आपले आत्मभान हरवले आहे आणि स्वतःला राजकीय पक्षांच्या दावणीला बांधून घेतले आहे. सामाजिक चळवळी आपल्या चळवळींची तत्त्वे, निष्ठ, उद्देश्य विसरून त्या राजकीय पक्षांच्या अजेंड्यावर काम करताना दिसत आहे. सध्या चळवळी दिशाहीन झालेल्या असल्याने जनतेच्या/ लोकांच्या मनात चळवळीबद्दल संभ्रमाची अवस्था निर्माण झाली आहे.

अशा पद्धतीने सामाजिक चळवळीचे बदलते स्वरूप हे सामाजिक परिवर्तन/ सुधारणा बाबतीत घातकी ठरत आहे. असे समाजघातकी मार्ग न स्वीकारता येणाऱ्या काळात आपण समाजहित / सामाजिक बांधिलकी जोपासणारे, सर्व स्तरावर समता, बंधुता आणि न्याय या तत्वावर आधारित उद्दिष्टे समोर ठेऊन सामाजिक सुधारणा होतील अशा प्रकारचे मार्ग अंगीकारणे गरजेचे आहे. हे आजच्या सामाजिक सुधारणा चळवळींच्या दृष्टीने २१ व्या शतकात भारतीय लोकशाही टिकवण्यासाठी आपल्या सर्वांच्या समोरील एक कसोटीचा काळ आहे.

**उद्दिष्टे -**

१) समाजातील मूल्ये, संकल्पना आणि अपेक्षांमध्ये होणारे वेगवान बदल. जे अपेक्षित आहे आणि जे स्वीकृत आहे त्यामधील अंतर जेव्हा मर्यादेपेक्षा अधिक रुंदावते, तेव्हा परिणामी संघर्षाची परिस्थिती निर्माण होऊन त्याची परिणती सांस्कृतिक, सामाजिक दरी निर्माण न होऊ देता सामाजिक समतोल राखणे चळवळीचे उद्दिष्ट असले पाहिजे.

(२) औद्योगिकीकरण, शहरीकरण जागतिकीकरण यांसारख्या बदलांच्या वेगवेगळ्या प्रक्रियांमुळे समाजात असमान व असंतुलित वाढ होऊ लागली आहे. समाजातील पूर्वप्रस्थापित निकषांशी नवीन मापदंड यावरून संघर्ष होऊ शकतो. एकाच वेळी समाजात जुन्या तसेच नव्या मापदंडाच्या अस्तित्वामुळे संभ्रमाची भावना निर्माण होऊन सामाजिक विघटन होणार नाही याची खबरदारी घेणे सामाजिक चळवळींचे आद्यकर्तव्य आहे.

(३) जेव्हा लोकांच्या एखाद्या समुदायात अधिकाऱ्यांनी/ सत्ताधाऱ्यांनी घेतलेल्या काही निर्णयांबद्दल असमाधान आणि असंतोष असतो. त्यावेळी सामूहिक नाराजी व्यक्त होऊन लोकांमध्ये संवेदित सामाजिक अन्यायाची भावना निर्माण होते. त्याची परिणती सामाजिक

चळवळी वर सर्वस्वी अवलंबून असते. सामाजिक स्वास्थ्य बिघडू न देणे हा उद्देश असायला हवा आहे.

(४) योग्य अनुशासनासाठी सुयोग्य असे मानदंड व नियम हे समाज सुनिश्चित करत असतो. सामाजिक आचरण पद्धती समाजातील नियमन व्यवस्थेशी जुळणे आवश्यक असते. तथापि काही परिस्थितीत नियमनांची ताठरता व लवचीकता कमी जास्त होऊन सर्वसामान्यांच्या अपेक्षांशी जुळत नाही. अशा वेळी सामाजिक चळवळींची भूमिका ही समाजात वादविवाद, तंटे निर्माण करणारी नसावी तर सामाजिक सलोखा जपणारी असवी.

**सामाजिक चळवळींची वैशिष्ट्ये-**

सामाजिक चळवळींचे स्वरूप, वैशिष्ट्ये, हेतू , उद्देश, गती आणि कार्यप्रणाली विभिन्न असते. आपणास सामाजिक चळवळींची पुढील काही महत्त्वपूर्ण गुणवैशिष्ट्ये सांगता येतील.

(१) मूलत: सामूहिक स्वरूप:

सामाजिक चळवळ ही एक व्यक्तिविशिष्ट कृती नसून यात सामूहिक कृती समाविष्ट असते. सामाजिक चळवळीत संपूर्ण समूह सहभागी असावा लागतो.

(२) नियोजित आणि हेतूपुरस्सर कृती:

सामाजिक चळवळी प्रभावीपणे अंमलात येण्यासाठी पूर्वनियोजित असे प्रारूप असणे आवश्यक आहे. चळवळ ही उत्स्फूर्त नसून तिला एखादा विशिष्ट हेतू किंवा विचार असतो.

(३) विचारप्रणाली आणि उद्दीष्टे:

सामाजिक चळवळीला विचारसरणीचे पाठबळ असते. विचारसरणी चळवळीचे उद्दिष्ट सफल / साध्य करण्यासाठी अनमोल असे मार्गदर्शन करत असते. उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठीचा चळवळ एक विचारांचा संच किंवा साठा असतो.

(४) सामाजिक बदल:

सामाजिक चळवळींचा उद्देश बदल घडवून आणणे हा असतो. चळवळ सामान्यतः प्रस्थापित अधिक्रमात बदल करण्याची मागणी करते किंवा सत्ताधिकाऱ्याने सुरू केलेल्या बदलास प्रतिरोध करते.

**सामाजिक चळवळींचे बदलते स्वरूप :-**

१)सामाजिक चळवळींची आक्रमकता बोथट झाली -

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर १९९० पर्यंतच्या काळात सामाजिक चळवळीची भूमिका अन्यायाविरुद्ध आक्रमकरीत्या संघर्षाचा लढा उभारून न्यायाची बाजू मांडणारी होती. आक्रमकता हा चळवळींचा बाणा होता. अलिकडच्या काळातील सामाजिक चळवळींमध्ये धर्मांध शक्तीचा शिरकाव, नेतृत्वाची स्वार्थासाठी लाचारी, नेतृत्वहीनता, आक्रमकतेचा अभाव यामुळे सद्य स्थितीत चळवळींचे स्वरूप बोथट झालेले दिसते.

२)वैचारिक मतभेद आणि चळवळीची शकले निर्माण -

उदा. दलित चळवळी, शेतकरी चळवळी, कामगार चळवळी या सारख्या अनेक चळवळी १९९० च्या अगोदर संघटित होऊन हक्क व अधिकार यांच्यासाठी लढत असल्याचे आपण पाहिले आहे. मात्र अलीकडच्या काळात सामाजिक चळवळींमध्ये असणारा एकोपा हा राजकीय स्वार्थापोटी असो की अंतर्गत वैचारिक मतभेद या शिवाय इतरही कारणे यामुळे राहिला नाही. चळवळीत दुफळी निर्माण होऊन शकले पडलेली आपण पहिली आहेत.

३) सामाजिक चळवळींनी आत्मभान विसरल्याने दिशाहीन बनल्या -

सामाजिक चळवळीतील नेते, कार्यकर्ते यांच्याकडे चळवळ चालवत असताना आवश्यक असणारे गुण , तत्व, निष्ठा, एकनिष्ठपणा याचा विसर पडतआहे. स्व:त्वाची जाणीव राहिली नाही. नेते, कार्यकर्ते हे व्यक्तिगत स्वार्थासाठी राजकारण्यांच्या हातातील कटपुतली बाहुले बनल्याने आत्मविश्वास गमावला आहे. राजकीय लोकांच्या इशाऱ्यावर चळवळींचे कृती कार्यक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे चळवळी सद्यस्थितीला दिशाहीन झाल्या आहेत हे वास्तव आहे. त्यांचे अस्तित्व पुसट होऊ लागले आहे.

४) सामाजिक चळवळीतील नेते आणि कार्यकर्ते राजकारण्यांचे गुलाम बनले -

सद्य स्थितीत सामाजिक चळवळींचे लागेबंध / संबंध हे राजकीय पक्षांशी जवळचे असलेले पाहायला मिळतात.

या सामाजिक संघटना आपल्या कृती कार्यक्रमातून राजकीय पक्षांचे उदात्तीकरण करत असतात. हे कृत्य करण्यासाठी सामाजिक चळवळींचे नेते आणि कार्यकर्ते यांना असणारा स्वार्थ, दिली जाणारी वेगवेगळी आमिष यामुळे चळवळी या राजकारण्यांच्या गुलाम बनल्या आहेत. सामाजिक चळवळी या राजकीय पक्षांच्या इशाऱ्यावर आपल्या चळवळींची वाटचाल / दिशा ठरवत आहेत . ही फार गंभीर सामाजिक समस्या आहे.

५) सामाजिक माध्यमातून (सोशल मीडिया)चळवळींच्या सुधारणा हेतुला बेगडी रूप धारण -

वास्तविक पाहता आजच्या घडीला फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप, इंस्टाग्राम या व्यतिरिक्त नवनिर्मित वापरात येणाऱ्या व्यक्तिगत सामाजिक माध्यमांचा वापर हा अतिरेकी स्वरूपाचा होत आहे. या माध्यमातून रंग, जात, धर्म, यांचे उदात्तीकरण होत असल्याचे दिसून येत आहे. वेगवेगळे सण, उत्सव, महापुरुषांच्या जयंतीचे कार्यक्रम या बरोबर इतर सामाजिक कार्यक्रमावेळी सामाजिक माध्यमांमधून जाहिरातबाजी, पोस्टरबाजी करून स्वतःला प्रकाश झोतात आणण्याचे काम सध्य स्थितीत नवनेतृत्व करत आहेत. अशा नेत्यांना व कार्यकर्त्यांना सामाजिक समस्या, सामाजिक चळवळींचे काम याबाबत कुठल्याही प्रकारचे भान राहिले नाही. नेतृत्व उदयास येत असताना त्याला कर्तृत्वाची जोड हवी असते. सामाजिक चळवळीचे भान आणि ज्ञान असणे ही काळाची गरज आहे. या गोष्टींचा अभाव नेते आणि कार्यकर्ते यांच्यामध्ये असल्याचे जाणवत आहे. यामुळे वास्तविक पाहता सामाजिक माध्यमांमधून चळवळींच्या सुधारणा अंगाला /बाजूला बेगडी

रूप धारण होत आहे. ही सामाजिक न्यायाच्या दृष्टीने चळवळींची वाटचाल ही गुंतागुंतीची होत चालली आहे.

६) मुकसमंतीने धर्मांध शक्तीचे समर्थन -

सामाजिक चळवळीतील नेते व कार्यकर्ते हे आजच्या घडीला राजकारण्यांचे बटिक बनल्यासारखे वागत आहेत.

आजचे राजकीय पक्ष हे धर्मांध शक्तीच्या विचारप्रणालीच्या धोरणानुसार आपले मार्गक्रमण किंवा कृती कार्यक्रम करत आहेत. हेच राजकीय पक्ष सामाजिक चळवळींना जवळ करून वर्णवर्चस्ववादी, जातिभेदाचा, धर्मभेदाचा आपला अजेंडा राबवत आहेत. सामाजिक चळवळींच्या माध्यमातून काम करत असताना चेहरा हा पुरोगामी आणि धोरण व कृती मात्र प्रतिगामी आहे. या सर्व गोष्टींची सामाजिक चळवळीतील नेते आणि कार्यकर्ते यांना याची जाणीव होत असताना देखील त्यांना आपली तत्वे, निष्ठा, कर्तव्ये, जबाबदाऱ्या याचा विसर पडला आहे. सत्तेपायी, स्वार्थासाठी, लाचारीचे जीवन जगत आहेत. आपले हक्क आणि अधिकार यांचे राज्य शासन किंवा केंद्र शासन स्तरावर होणारे हनन या सर्व बाबींविरोधात आवाज करण्याऐवजी सामाजिक चळवळी, नेते, कार्यकर्ते मूग गिळून गप्प बसत आहेत. या कृतीतून सिद्ध होते की चळवळी या एकंदरीत सत्तेतील पक्षांचे म्हणजेच पक्ष चालवणाऱ्या धर्मांध शक्तीचे मुकसमंतीने समर्थन करत असल्याचे जाणवत आहे.

**आव्हाने -**

१) कार्यकर्त्यांना सामूहिक प्रशिक्षणाचा अभाव -

सामाजिक चळवळींचा पाया हा चळवळीतील कार्यकर्ता असतो. भारतीय राज्यघटनेने आपल्याला दिलेले हक्क आणि अधिकार याची जाणीव करून देऊन त्यांना आपली कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या या विषयी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सामूहिक प्रशिक्षण शिबिरे, परिसंवाद, चर्चासत्रे आयोजित करून नेते आणि कार्यकर्ते यांना तत्वनिष्ठ, कर्तव्यनिष्ठ तयार करणे गरजेचे आहे. आजच्या युगात असे मार्गदर्शनपर कार्यक्रम घेऊन प्रशिक्षित कार्यकर्ते असणाऱ्या चळवळी या नगण्य प्रमाणात पाहायला मिळतात. त्यामुळे सामाजिक चळवळीत प्रामुख्याने प्रशिक्षित कार्यकर्ते आणि नेते यांचा अभाव असल्याचे दिसून येत आहे. जाणीव, जागृती, प्रचार आणि प्रसार करण्यासाठी चळवळींमध्ये प्रशिक्षणाचा अभाव असणे हे चळवळींच्या दृष्टीने अधोगतीचे लक्षण आहे.

२) सामाजिक चळवळीच्या क्रांतीमध्ये प्रतिक्रांतीचा वावर/ हस्तक्षेप -

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात देखील स्पृश्य -अस्पृश्य, जातीभेद, गरीब - श्रीमंत दरी, रंगभेद, स्त्रियांचे शोषण अशा अनेक सामाजिक समस्यांनी भारतीय समाज ग्रासलेला होता. अशा काळात अनेक संत, महंत आणि महापुरुषांनी आपल्या कार्यातून अखंड मानवजातीच्या कल्याणासाठी लढा उभारून सामाजिक न्यायाची भूमिका मांडली. काळाच्या ओघात त्या लढ्याला चळवळीचे स्वरूप आले. समता, बंधुता आणि न्याय तत्वावर आधारित कार्यप्रणाली राबविली गेली होती. चळवळींनी जातीअंताचा लढा उभारून, प्रबोधनाच्या माध्यमातून अनेक सामाजिक विषय घेऊन अन्यायाला वाचा फोडली. यातून

क्रांती निर्माण होऊन जे बदल झाले ते जगाच्या इतिहासात अलौकिक आणि अद्वितीय आहेत. मात्र सध्याच्या काळात या सामाजिक चळवळींना घरघर लागली आहे. कारण सामाजिक चळवळींच्या कार्यात प्रतिक्रांतीवादी यांचा हस्तक्षेप वाढत आहे. सामाजिक चळवळीतील प्रतिक्रांतीवादी यांचा वाढता हस्तक्षेप ही सामाजिक चळवळींसाठी धोक्याची घंटा असून हे सामाजिक चळवळीं समोरील एक आव्हान आहे.

४) सामाजिक सुधारणा चळवळींनी जनमानसाचा विश्वास गमावला -

सद्यस्थितीत सामाजिक चळवळींच्या कार्याचा, भूमिकांचा सामाजिक समतोल ढासळला असल्याने त्यांच्या समाजहित धोरणांचा, सार्वजनिक उपक्रमांचा, कार्यकर्तृत्वाचा ठसा हा समाज मनावर म्हणावा तितका प्रभावीपणे पडत नसल्याचे आढळून येत आहे. सामाजिक चळवळींनी जनमानसात जो आपला विश्वास गमावला आहे. तो विश्वास पूर्ववत रित्या मिळवण्यासाठी नव्या पिढीसमोर आदर्श स्वरूपाच्या चळवळींची उभारणी करून नवसमाज बांधणी मध्ये आपले योगदान देऊन जनमानसाचा विश्वास संपादन करणे हे सामाजिक सुधारणा चळवळीं समोरील एक आव्हान आहे.

५) नेतृत्वातील हेवेदावे यामुळे सामाजिक चळवळीची वाताहत -

सामाजिक सुधारणा चळवळींनी समाजात सामाजिक सलोखा कायम राहील अशा प्रकारचे समाजहित धोरणांचा अवलंब केला पाहिजे. यासाठी चळवळीचे नेतृत्व हे कणखर, अभ्यासू, निःस्वार्थी असावे. नेतृत्व पद, पैसा, खुर्ची यासाठी कुठल्याही प्रकारच्या अमिषाला बळी पडणार नाही हे तत्त्व पथ्य म्हणून पाळले पाहिजे. नेते आणि कार्यकर्ते यांनी पद, पैसा, सत्ता, खुर्ची यासाठी होणारे हेवेदावे यामुळे सामाजिक चळवळींची होणारी वाताहत ही समस्या एक सामाजिक चळवळींच्या समोरील एक आव्हान आहे.

६) लोकशाहीचा चौथा स्तंभ माध्यमे यांची भूमिका -

भारतीय लोकशाहीमध्ये माध्यमांना अतिशय महत्वाचे स्थान आहे. माध्यमांना लोकशाहीचा चौथा स्तंभ मानले जाते. मात्र सध्याच्या काळात हा स्तंभ निरपेक्षवादी भूमिका बजावत नसल्याचे दिसून येत आहे. माध्यमांच्या एकांगी भूमिकेमुळे सामाजिक चळवळींना अपेक्षित असलेला न्याय माध्यमांकडून मिळत नाही. येत्या काळात माध्यमांनी सामाजिक चळवळींच्या बाबतीत न्यायाची भूमिका बजावणे गरजेचे आहे. ही समस्या माध्यमांनी दूर वेळेत केली पाहिजे नाहीतर हे सामाजिक चळवळींच्या समोर असलेले आव्हान आहे.

**सामाजिक चळवळी व लोकशाही -**

सामाजिक चळवळी लोकशाहीला आकार देण्याचे काम करतात. मात्र बदलत्या परिस्थितीनुसार लोकशाही यंत्रणा बरोबरच सामाजिक चळवळी देखील संक्रमणावस्थेत आहेत. या सामाजिक चळवळीतून राजकीय नेतृत्वास वाव मिळतो व नवीन राजकीय नेतृत्व उदयास येते. मात्र संक्रमण अवस्थेतील लोकशाहीत चळवळी या सध्या उदासीन अवस्थेतून आपली भूमिका बजावत आहेत. सर्वसामान्य तरुणांचा सामाजिक चळवळीकडे बघण्याचा दृष्टिकोन निश्चितच कालमानाप्रमाणे बदललेला आहे हे सत्य ही आपल्याला

नाकारून चालणार नाही. सामाजिक चळवळी टिकल्या तरच लोकशाही टिकेल आणि लोकशाही ती टिकली तरच आपली जीवनशैली परंपरागत चालण्यास मदत होणार आहे. यातूनच सामाजिक चळवळींच्या उन्नती बरोबरच लोकशाहीचे संवर्धन करणे प्रत्येक भारतीय नागरिकांचे आद्यकर्तव्य आहे. कारण याच सामाजिक चळवळी लोकशाही शासन व्यवस्थेचा आत्मा आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. म्हणूनच सामाजिक चळवळीतून आपण लोकशाही संवर्धनाचे काम हाती घेण्यास हरकत नाही आणि ते घेणे ही आज काळाची गरज आहे.

**निष्कर्ष -**

सामाजिक सुधारणा योग्य वेळी सर्वांच्या प्रयत्नाने अंमलात आणल्या गेल्या, तरच समाजाला योग्य दिशेने वाटचाल करण्यास मदत होईल. या सुधारणा अपेक्षेनुसार घडून येतातच असे नाही. त्यांमध्ये अनेक अडथळे येतात. हे अडथळे धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक व मानवी स्वरूपाचे असतात. याचा साकल्याने विचार करून, समाजहित डोळ्यासमोर ठेवून व सामाजिक नीतिमूल्यांची बूज राखून सामाजिक सुधारणांचा पाठपुरावा केला पाहिजे. केवळ कायदे करून समाजसुधारणा होत नाही. कायद्याला सूज्ञ समाजाची संमती अपरिहार्य असते.

**संदर्भ ग्रंथ -**

१) दलित चळवळीची वाटचाल केशव गोरे स्मारक ट्रस्ट - मुंबई, रावसाहेब कसबे (१९८३)

२) महाराष्ट्रातील दलित चळवळ कनक पब्लिकेशन नवी दिल्ली. पी. जी. जोगदंड (१९९१)

३) भारतातील सामाजिक चळवळी - घनशाम भाहा.

४) आंबेडकर चळवळीचा वारसा निर्मिती विचार मंच, कोल्हापूर. डॉ. प्रतिभा पाटणकर(२००८)